


सौ. नीलिमा प्रकाश प्रधान


मुंबईच्या बोरिवली व मालाड या उपनगरात वास्तव्य करणाऱ्या सौ. नीलिमा प्रकाश प्रधान या भारतातील एक मान्यवर ज्योतिषी म्हणून ओळखल्या जातात. ज्योतिष हा अभ्यासाचा विषय मानून त्यांनी त्याची सातत्याने साधना केली. 'ज्योतिष महामहोपाध्याय' ही पदवी त्यांनी संपादन केली. सर्वसामान्य माणसापासून राष्ट्रीय नेत्यांपर्यंत अनेकांना त्यांनी ज्योतिषविषयक मार्गदर्शन केले आहे. श्रीमती इंदिरा गांधी, मोरारजी देसाई, शरद पवार, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, सुशीलकुमार शिंदे, भाई सावंत अशा अनेक मान्यवरांना त्यांच्या अचूक भाकितांचा अनुभव आला आहे. २६ सप्टेंबर १९८४ रोजी दिल्लीतील निवासस्थानी श्रीमती इंदिरा गांधी यांनी सौ. नीलिमा प्रधान यांची भेट घेऊन चर्चा केली. दुर्दैवाने त्यांनी श्रीमती इंदिराजींबद्दल केलेले अशुभ भाकित खरे झाले. सौ. प्रधान यांनी ज्योतिषविषयक विपुल लेखन केले आहे तसेच वृत्तपत्रे, मासिक यातून भविष्यविषयक लेखन नियमितपणे केले आहे. दूरचित्रवाणीवरूनही त्यांनी ज्योतिषकथन व अन्य कार्यक्रम केले आहेत. 'भावस्वभाव', 'वेद विश्वासाचा', 'रत्नांच्या सहवासात', 'तुमचा तळहात तुम्हीच पाहा', 'वास्तुशास्त्र- कोणासाठी, कशासाठी', 'होमिओपॅथी व बाराक्षार', 'नक्षत्रावरून जीवनसाथी' अशी पुस्तके सौ. नीलिमा प्रधान यांनी लिहिली आहेत. सौ. प्रधान यांनी संगीताचा आणि फाईन आर्टचा अभ्यास केला आहे. त्यांची पेंटिंग्ज विदेशातही गेली आहेत. होमिओपॅथीचा त्यांचा व्यासंग आहे तसेच गृहसजावट हा त्यांच्या आवडीचा आणि अभ्यासाचा विषय आहे. बोरिवली पूर्व, राजेंद्रनगर येथे 'नीलिकाश ज्योतिष संस्था' या संस्थेत त्या सध्या भविष्यविषयक मार्गदर्शन करतात. त्यांचे पती श्री प्रकाश प्रधान व सुपुत्र नीलिकाश हेही ज्योतिषाचे अभ्यासक आहेत.



नीलिकाश ज्योतिष संस्था,
१५-२५२, राजेंद्रनगर, बोरिवली (पूर्व) मुंबई - ४०० ०६६.
फोन : ०२२-२८४४०९६५, २८७०५२७०




# आगामी वर्षाचे राशीभविष्य


सौ. नीलिमा प्रकाश प्रधान


## मेष



**दुर्जन आणि साप यामध्ये साप परवडला कारण साप एकदाच चावून घेतो, तर दुर्जन मात्र पावलोपावली दंश करतो.**


पावलोपावली दंश करणाऱ्यांना मात्र तुम्ही कार्याने, प्रेमाने व मदतीने जवळ करता. हे बुद्धिमान व्यक्तीचे लक्षण असते. अधिकाराने गप्प बसविण्याची कला तुम्हाला वापरता येते. नोव्हेंबरमध्ये गुरुचे धनु राशीतून भ्रमण होत आहे. जुन्या अनुभवातून नवीन विचारांची दिशा तुम्हाला २००८ मध्ये शोधता येईल. सिंह राशीत शनि नोव्हेंबरमध्ये वक्री होऊन मे मध्ये मार्गी होत आहे. एप्रिल ०८ ला राहू मकरेत येत आहे. हर्षल, नेपच्युन तुमचे व्यक्तिमत्त्व अधिकच प्रकाशमान करणार आहेत. प्रत्येक क्षेत्रातील वाटचाल जोमाने व ऐटीत असेल. गेलेले अधिकार परत मिळतील. आर्थिक आवक वाढेल, खर्च वाढतील. सुखाचे स्वप्न पूर्ण होईल. नोकरीत बढती, बदली मनाप्रमाणे होईल. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च ०८ आलेख उंचावणार आहे. कौटुंबिक तणाव मिटतील. अविवाहितांचे विवाह जमतील.

**राजकीय व सामाजिक क्षेत्र :** एका एका मताचे महत्त्व तुम्ही जाणता. म्हणूनच एकमत तुमच्या बाजूने असते. सुज्ञ व्यक्ती आपल्याबरोबर इतरांचाही विकास करीत असते. मेष व्यक्ती राजकीय व सामाजिक क्षेत्रात यामुळेच पुढे येतात. चार भिंतीतले राजकारण त्यांना आवडत नाही. व्यापक कार्य व व्यापक विकास हेच त्यांचे तत्त्व असते. आकर्षकता असल्याने सर्वांना एकत्र जमवतात. डिसेंबर, मार्च, एप्रिल ०८ मध्ये तणाव व विरोध सहन करावा लागेल. मे, जून ०८ मान, प्रतिष्ठा वाढेल.

**विद्यार्थी :** मोठी महत्त्वाकांक्षा ठेवतात; परंतु मेहनत करण्यापेक्षा दादागिरीत वेळ घालवू नका. २००८ तुमच्यासाठी उत्कर्षाचे आहे. चांगले प्रयत्न, चांगले यश.

**साहित्य-कला-क्रीडा क्षेत्र :** लेखणीला चांगली कलाटणी मिळेल. कलावंतांचा प्रभाव वाढेल. जानेवारी, फेब्रुवारी ०८ मध्ये नावलौकिक, बक्षीस मिळेल. जून ते ऑगस्ट आर्थिक लाभ मिळेल. एप्रिल ०८ धाडसाने इजा संभवते.

## वृषभ



**नेम चुकल्यावर निराश होऊ नका. नंतरचा लागेल. त्यानंतरचा लागेल. हेच जीवन आहे.**

कालचक्र हे कायम गतिमान असते. दिवसामागून रात्र धावते, रात्रीमागून दिवस. यामुळे संकट कोणतेही असो आपला चरितार्थ चालूच ठेवावा लागतो. कालगति ही निर्गुण, निराकार असते. त्याला सुख-दुःखाचा स्पर्श नसतो. तो परिणाम व स्पर्श माणसाला असतो, निसर्गाला असतो. नोव्हेंबरमध्ये गुरुचे धनु राशीतून भ्रमण होत आहे. पैसा मिळेल; परंतु कोणत्याही प्रकरणाचा नीट अभ्यास करा. एप्रिलमध्ये राहू मकर राशीतून भ्रमण करीत आहेत. शनि नोव्हेंबरमध्ये वक्री होऊन मे ०८ मध्ये मार्गी होत आहे. सिंह राशीतील शनि तुमचा व्यवहार चोख ठेवण्यास सांगत आहे. जर तुम्ही चोख असाल तर स्थावर इस्टेट होईल, नवीन


(पुढील पानावर)

(मागील पानावरून)

घराचे स्वप्न पाहता येईल. इतरांच्या भानगडीत पाय अडकवू नका व दुसऱ्याच्या प्रगतीआड येऊ नका. म्हणजे २००८ मध्ये निभावून जाल.

आर्थिक फायदा होईल. प्रकृतीची हेळसांड करू नका. जास्त पैसा व्यसनाला आमंत्रण देणारा असतो. डिसेंबर-जानेवारी ०८ आरोप, प्रकृती तक्रार व चिंता निर्माण करील.

**राजकीय व सामाजिक क्षेत्र :** गंभीरपणे विचार करण्याची वेळ २००८ मध्ये तुमच्यावर येईल. फार मोठे, मोहक, लाभाचे गाठोडे पुढे येईल. ते मृगजळ आहे का सत्य, हे तपासून पाहणे हेच तुमचे कौशल्य ठरणार आहे. विचारांची दिशा पटापट बदलून प्रगती साधण्याचे तंत्र कदाचित थोडे रेंगाळलेले वाटेल. पक्षश्रेष्ठी तुमच्या स्वभावावर खुश राहतील. धीर मात्र सोडू नका.

नोव्हेंबर-डिसेंबर रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. जानेवारी ते डिसेंबर ०८ अचूक संधी टिपता येईल, मान वाढेल.

**विद्यार्थी :** चमचमीत पदार्थ खाण्याने प्रकृतीला त्रास देऊ नका. कुसंगतीने हिरासुद्धा भंग पावतो. तेव्हा चांगल्या विचारांचे आचरणच तुम्हाला यश देईल. प्रेम प्रकरणात लक्ष देऊ नका.

**साहित्य-कला-क्रीडा क्षेत्र :** तुमच्या कार्याची पताका परदेशात पोहोचवू शकाल. एप्रिल, मे ०८ दुखापत संभवते. अवमान सहन करावा लागेल. प्रमाणाबाहेर परिश्रम होतील. आर्थिक लाभ होईल. स्पर्धा जिंकण्यासाठी कष्ट घ्यावे लागतील. व्यसनांचा आधार म्हणजे कलेवर अन्याय होईल. मार्च, एप्रिल, ऑगस्ट सन्मानाचे प्रसंग येतील.



## मिथुन

**सापाच्या दातांत, माशीच्या डोक्यात आणि विंचवाच्या शेपटीत जहर असते; परंतु दुर्जनांच्या अंगोपांगात विष भिनलेले असते.**


गेली अनेक वर्षे साडेसातीने आपणास हैराण केले. मनुष्यरूपात सापाचे, माशीचे, विंचवाचे विष जहर आपण अनुभवले. दुर्जनांच्या अंगोपांगात कसे विष भिनलेले असते हे पाहिलेत. आता साडेसाती पूर्णपणे संपली आहे. २१ नोव्हेंबर रोजी गुरु आपल्या भाग्यस्थानात प्रवेश करीत आहे. आपल्या प्रगतीचा आलेख आता सर्वच क्षेत्रात उंचावत जाईल; परंतु २९ एप्रिलला राहू आपल्या अष्टमस्थानात प्रवेश करीत आहे. मे-जूनमध्ये तो एखादी धक्कादायक घटना घडवू शकतो. सावध राहा.

आर्थिक व्यवहारात मात्र राहू फार मोठा लाभ करून देणार आहे. धंद्याला चांगली बाजारपेठ मिळेल. जगात प्रसिद्धी मिळेल. आयात-निर्यात वाढेल. स्थावर मालमत्तेच्या व्यवहारात फायदा होईल. जमलेले विवाह डिसेंबरमध्ये उरकून घ्या.

**राजकीय व सामाजिक क्षेत्र :** डिसेंबर ते मे ०८ राजकीय व सामाजिक क्षेत्रात जास्तीत जास्त काम करून घेता येईल. जानेवारी ०८ व्यवहाराच्या गणितात सावध राहा. आपण दिलेले आश्वासन पूर्ण करताना जून ०८ मध्ये अडथळे येतील. तुमच्या प्रतिष्ठेला धक्का देण्याचा प्रयत्न होईल. पूर्वीच्या अनुभवाचा उपयोग करून घेता येईल. पद मिळेल. जुलै ०८ ते सप्टेंबर ०८ विरुद्धलिंगी व्यक्तीच्या पाठिंब्याने पुन्हा चमकाल. आपल्याला केलेल्या मदतीची आठवण मात्र तुम्हाला ठेवावी लागेल.

**साहित्य-कला-क्रीडा :** आपले लिखाण २००८ मध्ये विशेष गाजेल. स्पर्धेत जिंकता येईल. मे व जून ०८ वादग्रस्त प्रश्न निर्माण होईल; परंतु त्यातूनच पैसा मिळण्याची शक्यता आहे. फेब्रुवारीत दुखापत संभवते. त्यामुळे खेळाडू व कलाकार यांना विश्रांती घ्यावी लागेल.

**विद्यार्थी :-** आळसाने कसे नुकसान होते याचा अनुभव तुमच्याकडे आहे. २००८ मध्ये तुम्ही चांगले यश संपादन करू शकाल. मे ०८ व ऑगस्ट ०८ या परीक्षेसाठी जास्त अभ्यास करा.



## कर्क

**ज्या प्रकारे शरीर स्वच्छ राखण्यासाठी नियमित स्नान करण्याची जरूरी असते, त्याप्रमाणे अंत:करण स्वच्छ ठेवण्यासाठी नियमितप्रमाणे प्रार्थना करण्याची जरूरी असते.**

साडेसाती सुरू आहे. शेवटचा टप्पा जन्मकुंडलीनुसार काहींना फायदेशीर ठरतो तर काहींना चांगलाच फटका देऊन जातो. शनि महाराज जाता-जाता काहीही करून जातात. जन्मकुंडलीनुसार याचा अंदाज बांधता येतो. मात्र यंदा २१ नोव्हेंबरला आपले गुरुबलही संपुष्टात येत आहे. मनात चांगले- वाईट विचार येतील. या वेळी ईश्वरी उपासना, प्रार्थनाच आपणास मानसिक स्वास्थ्य देईल. फेब्रुवारी, मार्च हे महिने धक्कादायक

(पुढील पानावर)



## हे वर्ष जगाला कसे जाणार?

अमेरिकेला वर्षाचा पूर्वार्ध चांगला आहे. काही जागतिक करार करण्यात अमेरिका यशस्वी होईल. शत्रूवर दडपण आणू शकेल. डिसेंबरपासून अमेरिकन शेअर मार्केट डाऊजोन्स आणि 'नसडक'वरती जाईल. त्यांचा इंडेक्स वाढेल. मात्र मे महिना अमेरिकेला एखादा मोठा धक्का देऊन जाणार आहे. तिसऱ्या महायुद्धासारखे वातावरण मे नंतरच निर्माण होऊ शकते.

रशियालाही मे महिना चांगला नाही. मे ते सप्टेंबर यादरम्यान जगात कोठेही भूकंप होण्याचा संभव आहे. जानेवारी, फेब्रुवारी महिनेही जगात नैसर्गिक आपत्ती, भूकंप घडवू शकतात.

इंग्लंडला हे वर्ष चांगले आहे. जगात त्यांचे वर्चस्व वाढेल. जपानला व्यापारात फायदा होईल, नवीन टेक्नॉलॉजीत नाव मिळेल. जर्मनी, इराण, नॉर्वे, मोरक्को, ऑस्ट्रेलिया, स्पेन, अरबस्तान आदी देशांना हे वर्ष प्रगतिकारक जाणार आहे. चीनच्या बाजारपेठेला मेपासून ओहोटी लागेल. राजकीय डावपेचांना तोंड देण्यात चीन मे नंतर हळूहळू अडचणीत येईल. चीनलाही भूकंपापासून अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक नुकसानीला तोंड द्यावे लागेल. स्वित्झर्लंड, वेस्ट इंडिजमध्ये राजकीय गोंधळ माजेल. फ्रान्स, इटलीला हे वर्ष संमिश्र फळे देणार आहे.

(मागील पानावरून)

घटना घडविणारे आहेत. यंदाच्या वर्षात जवळच्या व्यक्तीचे निधन संभवते.

आर्थिक व्यवहार जरा जपूनच करा. शेअर्स उलाढालीत बेसावध राहिल्यास मोठा फटका बसू शकतो. फेब्रुवारी, मार्च महिने कसोटीचे जातील; परंतु २९ एप्रिलच्या राहू राश्यांतरानंतर कठीण प्रकरणे मार्गी लागतील. धंद्यात आवक वाढू लागेल.

**राजकीय व सामाजिक क्षेत्र :–** निवडणुकीत एका मताने विजय अथवा पराजय होऊ शकतो. त्यामुळे एका मतासाठीसुद्धा गाफील राहून चालणार नाही. कुणालाही कमी लेखून मोठे होता येईल असा समज ठेवू नका. गुप्त कारवायांचा त्रास डिसेंबर, जानेवारी ०८ मध्ये होऊ शकतो. मार्च ०८ कामाची फार दगदग होईल. ठरविलेले काम वेळेत पूर्ण करताना अडचणी येतील. जून, जुलै ०८ प्रतिष्ठा धुळीला मिळविण्याचा प्रसंग येऊ शकतो. विरुद्धलिंगी व्यक्तीपासून धोका संभवतो. विलासीवृत्ती व व्यसन याच्या जाळ्यात फसू नका.

**विद्यार्थी :–** ज्याच्याकडे नियमितपणा असतो, वेळेची किंमत ज्याला समजते त्याला कठीण काळातसुद्धा सहसा अपयश येत नाही. २००८ मध्ये वेळच्या वेळी अभ्यास करा. यशासाठी सोपा मार्ग शोधू नका. वात्रट मुलांच्या संगतीने तुमचे भवितव्य वाऱ्यावर सोडू नका. फेब्रुवारी, मार्च ०८ प्रकृतीच्या त्रासाने अडथळे येतील. जुलै ०८ परिश्रम सोडू नका.

**साहित्य-कला-क्रीडा क्षेत्र :–** कर्क रास ही कलावंतांची रास आहे. राज कपूरची कर्क रास होती. ते अजरामर कलाकृती ठेवून गेले. त्यामुळे २००८ मध्ये तुम्हाला अविश्रांत परिश्रम घ्यावे लागतील. टीका, स्पर्धा व अडचणी यावर मात करून जय मिळवावा लागेल. प्रसंगी तडजोड स्वीकारावी लागेल. एप्रिल, मे ०८ सुखद घटना, मनाला उत्साह मिळेल.



# सिंह

**होऊन गेलेल्या गोष्टींकडे ढुंकूनही न पाहता पुढे पाहत राहा. परमेश्वराने यासाठी मागे डोळे न देता पुढे दिले आहेत.**

**गे**ली दोन वर्षे अनेक घटना घडल्या त्या आपल्या आयुष्यात विसरूही शकणार नाहीत. मात्र आता होऊन गेलेल्या गोष्टींकडे मागे वळून पाहू नका. परमेश्वराने म्हणूनच आपणास मागे डोळे दिले नाहीत. साडेसातीचा मधला टप्पा सुरू झाला आहे. २१ नोव्हेंबरपासून आपणास गुरुबलही लाभणार आहे. २९ एप्रिलची राहू-केतू राश्यांतर आपला आत्मविश्वास अधिकच वाढविणार आहे. पक्षात एकमत साधण्यात आपला पुढाकार असेल.

आर्थिक चिंता कमी होतील. बेकारांना नोकरी लागेल. नोकरीत बढती. परदेशात जाण्याचे योग संभवतात. धंद्यावरचे मंदीचे सावट संपेल. थोरामोठ्यांच्या सहकार्याने मोठे प्रकल्प उभारू शकाल. प्रवास होईल, प्रगतिरथ वेगाने धावेल.

**राजकीय व सामाजिक क्षेत्र :–** साडेसाती असूनही जो आपली मर्यादा ओळखून व वडीलधाऱ्यांचे अनुभव बरोबर घेऊन जातो तो तरतो. तुम्ही तुमच्या तत्त्वात बदल न करतासुद्धा मता मताला महत्त्व दिले व एकमत तुमच्या बाजूने वळविले तर तुमची २००८ मध्ये अधिकच ओजस्वी प्रतिमा तयार होईल. तुमचे महत्त्व पटेल. तुमच्यातील धमक स्थिर व ठाम आहे, याची खात्री मार्च ते जुलै ०८ यामध्ये अधिकच पटेल. एप्रिल ०८ प्रकृतीवर ताण पडेल. ऑगस्टमध्ये संतापजनक कृत्य सहन करावे लागेल.

**विद्यार्थी :–** जेवढे मोठे आपले स्वप्न असते तेवढेच मोठे प्रयत्न त्यासाठी लागतात.

अहंकार न ठेवता वागा. फेब्रुवारी, एप्रिल या महिन्यात वाटेल ते धाडस करू नका, त्रास होईल. २००८ चा प्रवास अभ्यासाला चांगला आहे.

**साहित्य-कला-क्रीडा :–** साहित्यातील चमक मार्च, एप्रिल, मे मध्ये दाखविता येईल. कलावंत व खेळाडू यांना मे ते ऑगस्ट या काळात विरोध सहन करावा लागेल. भूमिकेशी समरस होताना दडपण येईल. जवळच्या व्यक्तीचा विरह होईल. तरीही २००८ तुमच्या सर्वांसाठी नक्कीच प्रगतिकारक आहे. अडचणी तुम्ही मानतच नाही.




# कन्या

**पुस्तकी ज्ञान, व्यवहार ज्ञान आणि अनुभवजन्य ज्ञान याचा समन्वय साधणे हीच सत्य ज्ञानाची खूण**

**आ**पणाकडे चांगले पुस्तकी ज्ञान आहे, व्यवहारज्ञानही आहे परंतु कधी-कधी आपण भावनेत सगळ्याच व्यवहाराच्या गोष्टी जवळच्या व्यक्तींना सांगून टाकता. आता साडेसाती सुरू झाली आहे. तेव्हा बोलताना, वागताना सावध राहा. आपले अनुभवजन्य ज्ञानही उत्तम आहे. त्यामुळे आपण उत्तम लिखाण करू शकता. सोसायटीत, भागीदारीत एकमत साधू शकता. २१ नोव्हेंबरचे गुरू राश्यांतर डिसेंबर, जानेवारी व एप्रिलमध्ये काही समस्या निर्माण करणार आहे. मात्र २९ एप्रिलचे राहू राश्यांतर आपणास फायदेशीर

(पुढील पानावर)



## हे वर्ष भारताला कसे जाणार?

**भा**रताला हे वर्ष कसोटीचे जाणार आहे. डिसेंबर, जानेवारीत राजकीय वादळे, नैसर्गिक आपत्ती, भूकंप, थंडीची लाट, मोठे अपघात, आगी लागणे आदी संभवतात. केंद्र सरकार कोसळण्याची शक्यता आहे. दिल्लीत डिसेंबर, जानेवारीमध्ये तणावपूर्ण वातावरण राहील. जगाशी कसे वागावे, काही करार करताना गोंधळ उडण्याची दाट शक्यता आहे.

यंदाच्या वर्षात भारत काही नामवंत, प्रसिद्ध, श्रेष्ठ राजकीय व्यक्तींना त्याचप्रमाणे चित्रपटसृष्टीतील, साहित्यिक, क्रीडा क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तींना मुकणार आहे. हे भारताचे न भरून येणारे नुकसान या वर्षात होईल. संपूर्ण भारतीय जनतेला धक्का देणारी घटना यंदाच्या वर्षात घडण्याचा संभव आहे. युद्धजन्य स्थिती होण्याचाही संभव आहे. मे नंतर मात्र भारताचे नाव हळूहळू जगाच्या कानाकोपऱ्यात पसरून भारताची महती वाढू लागेल.


(मागील पानावरुन)
ठरणार आहे.

यंदा शेअर्स उलाढालीत विचारपूर्वक निर्णय घ्या. नोकरीत काही विघ्नसंतोषी लोक त्रास देतील. धंद्यात भागीदारांबरोबर, कुटुंब जीवनात सर्वांबरोबर एकमत साधणे थोडे कठीण जाईल.

**राजकीय-सामाजिक क्षेत्र :-** मतांची भाषा वळवावी तशी वळते. याचे तुम्हाला चांगलेच ज्ञान आहे. मता-मतांनी साधलेले एकमतच तुम्हाला मोठे करते याचा विसर पडू देऊ नका. 'आपणच सर्वज्ञ' या भ्रमात राहणे धोक्याचे ठरेल. तोडीस तोड, कट्टरास कट्टर तुम्हाला २००८ मध्ये भेटणार आहे. गुप्तकट फेब्रुवारी ते मार्चमध्ये उघड होण्याची शक्यता आहे. काळजी घ्या. मे मध्ये जवळच्या व्यक्ती विश्वासघात करण्याची शक्यता आहे. सप्टेंबर- अपघात, मनःस्ताप व आरोप.

**विद्यार्थी :-** मला सर्व अभ्यास समजला आहे. मागील परीक्षेत मी पास आहे. आता मला काही काळजी नाही या विचारात राहिलात तर नापास होण्याची शक्यता आहे. फेब्रुवारी, एप्रिल, मे, ऑगस्ट परीक्षांना जास्त अभ्यास करा. परिस्थितीचे गुलाम न होता. त्यावर मात करा.

**साहित्य-कला-क्रीडा :-** मे, जूनमध्ये धाडसी कृत्य त्रासदायक ठरेल. अचानक यंत्रात बिघाड झाल्यामुळे कामात अडचणी येऊ शकतात. सुरळीत चाललेले लिखाण वा खेळ अथवा अभिनय याला कुणीतरी खीळ बसवतो आहे, असे अनुभवास येईल. जिद्द ठेवावी लागेल. ताण, विरह व चिंता यांच्या अडथळ्यातून तुम्हाला तुमचा मार्ग शोधावयाचा आहे. निःस्वार्थी भूमिका ठेवावी लागेल.



## तुळ

**स्त्रियांना मनात साचलेले दुःख मोकळे करायला अश्रूंचे पाट ठेवलेले आहेत, पण पुरुषांना मात्र ते अडविण्यासाठी जागोजागी विवेकाचे घाट बांधावे लागतात.**


'ग्रह फिरले की घराचे वासे फिरतात'; परंतु घरातील कर्त्या पुरुषाला विवेकानेच वागावे लागते. स्त्रियांचे दुःख अश्रूंच्या पाटांनी हलके होते. यंदाच्या वर्षाचा पूर्वार्ध देदीप्यमान असला तरी उत्तरार्धात काही संकटांना तोंड द्यावे लागणार आहे. विशेषतः २० जानेवारी ते १५ फेब्रुवारी, १६ मे ते २० जून हा कालखंड तणाव, चिंता निर्माण करणारा आहे. यावेळी प्रसंगावधान राखून सर्वच क्षेत्रांत वागावे लागेल. विवेक ठेवावा लागेल.

आर्थिक बाजू आपण यंदाच्या वर्षात पूर्वार्धातच मजबूत करा. निरनिराळ्या संधी येतील. धंद्यात चांगली गती मिळेल. २१ नोव्हेंबरचे गुरु राश्यांतर नोकरी-धंद्यातील आपली प्रतिष्ठा उंचावणार आहे. मात्र २९ एप्रिलचे राहू राश्यांतर चांगले नाही.

**राजकीय व सामाजिक क्षेत्र :-** राजकारणात राहूनही समाजकार्य करण्याची वृत्ती जास्त असणे महत्त्वाचे असते. लोकांसाठी कार्य केल्यास त्यांच्या मतांचा फायदा होतो. २००८ तुळ राशीला फायदेशीर ठरणार आहे. कोणत्याही क्षेत्रातील खाते तुमच्याकडे असले तरी तुम्ही तुमची भूमिका चोखपणे निभावू शकाल. जानेवारी, फेब्रुवारीमध्ये मतभेद होतील. मार्च, एप्रिल गुप्त कारवायांचा त्रास जाणवेल. मे महिन्यात मान-सन्मानाचा प्रसंग अनुभवाल. चांगले पद मात्र मेपूर्वीच मिळवा. तुमच्या मतांचा पुरस्कार करता येईल.

**विद्यार्थी :-** हुशार विद्यार्थी अभ्यासात नियमितपणा ठेवण्याचा कंटाळा करतात. निश्चय व प्रयत्न यानेच विजय खेचता येतो. ग्रहांची साथ आहे. मार्चच्या परीक्षेला जास्त अभ्यास करावा. प्रकृतीची अडचण येऊ शकते. जून व ऑगस्ट अभ्यासात अडथळे येतील.


**साहित्य-कला-क्रीडा :-** क्षेत्र कोणतेही असले तरी तुमचे वर्चस्व सर्वात दिसून येईल. अधिकार मिळतील, बक्षिसे मिळतील, प्रतिष्ठा वाढेल, कौतुकाचा वर्षाव होईल. व्यापक स्वरूपाचे नावलौकिक होईल. फेब्रुवारी ते जूनमध्ये आपसांत गैरसमज होतील. ऑगस्टमध्ये नियमांचे पालन करावे लागेल.



## वृश्चिक

**विचारांच्या तुंबळ युद्धात पुस्तके शस्त्रांचे काम करतात.**

आपण नेहमीच फार विचार करता. मनात सतत उलट-सुलट विचार चालू असतात. सुतावरून स्वर्ग गाठणारी आपण माणसे! कुठलाही विचार अगदी टोकापर्यंत करता. मात्र आपण डॉक्टर, वकील, न्यायाधीश, पत्रकार व शिक्षक कुठल्याही क्षेत्रात असला तरी पुस्तकाच्या वाचनानेच विचारांच्या तुंबळ युद्धात स्वतः स्वतःचेच निभावून जाता व मार्ग काढता. ग्रहचक्र आपणावर खुश आहे. २१ नोव्हेंबरचे गुरु राश्यांतर आपल्या प्रगतीचा आलेख उंचावेल तर २९ एप्रिलचे राहू राश्यांतर आपल्या साऱ्या शत्रूंनाच चारीमुंड्या चीत करेल.



### वर्ष महाराष्ट्राला कसे जाणार?


महाराष्ट्राला हे वर्ष चांगले आहे. पाऊस चांगला पडेल, शेती चांगली होईल. जागतिक बाजारपेठ मिळेल. महाराष्ट्राचे नाव जगात गाजेल. महाराष्ट्रात तूर्त तरी नेतृत्वबदल संभवत नाही.

पुणे, नागपूर, कोलकाता, दिल्ली, बंगाल, पंजाब या शहरांत मात्र अस्थिरता राहील. नैसर्गिक आपत्ती, काही वेगळ्याच प्रकारच्या घटना या शहरात घडणार आहेत. सविस्तर लिहिणे योग्य नाही. भारतात डिसेंबरपासून शेअर मार्केट कोसळण्यास सुरुवात होईल. शेअर मार्केट यंदाच्या वर्षात कोसळले तरी काळजी करू नका. पुढे ते ४०,००० पर्यंत जाणार आहे.

आर्थिक उलाढालीत फायदा होईल. शेअर्समध्ये मात्र आपण आपले निर्णय स्वतःच घ्या. बहुमताने वागलात तर फसाल. नोकरीत एप्रिलनंतर बढती, पगारवाढ, चांगली नोकरी मिळेल. धंद्यातील आवक वाढेल, परदेश प्रवास होईल.

**राजकीय व सामाजिक क्षेत्र :-** शत्रू असो की मित्र, तुम्ही प्रत्येकालाच चांगली वागणूक देता; परंतु वेळ आल्यावर मात्र ज्याची त्याची जागा ज्याला त्याला दाखवून देता. जूनपासून तुमचे शत्रू

(पुढील पानावर)




## नेत्यांना आगामी वर्ष कसे जाणार?

**श्रीमती सोनिया गांधी :-** वर्षाचा पूर्वार्ध चांगला आहे. डिसेंबर, जानेवारीच्या सुरुवातीला घेतलेले निर्णय जागतिक प्रसिद्धी मिळवून देतील. मात्र १५ जानेवारी ते १० फेब्रुवारी व मे, जून महिने कसोटीचे जातील. या वेळी 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' हे धोरण ठेवावे लागेल.



**शरद पवार :-** डिसेंबर महिन्याचे पहिले १५ दिवस कसोटीचे असले तरी वर्ष चांगले आहे. पंतप्रधानपद मिळण्याची शक्यता वाढत आहे.



**सुशीलकुमार शिंदे :** वर्षाचा पूर्वार्ध चांगला जाईल. उत्तरार्ध थोडा कसोटीचा, तणावाचा जाईल.

**विलासराव देशमुख :** वर्षाच्या सुरुवातीलाच शत्रू चारीमुंड्या चीत होतील. संक्रांतीपासून १५ दिवस तर मे महिन्याच्या शेवटचा पंधरवडा कसोटीचा जाईल. गुप्त हितशत्रूंच्या कारवायांवर लक्ष ठेवावे लागेल. प्रयत्नाने आपण विजयश्री सहज खेचून आणाल.



**राहुल गांधी :-** वर्ष चांगले आहे. थोरामोठ्यांचे सहकार्य लाभेल. जगात नाव होईल.

**सुप्रिया सुळे :-** कठीण काळ संपला आता आपला प्रगतिरथ चौफेर धावेल.

**अमिताभ बच्चन :-** पूर्वार्ध चांगला. मेपासून नसती शुक्लकाष्टे मागे लागतील.



**सचिन तेंडुलकर :-** गेली दोन वर्षे फार कसोटीची होती. डिसेंबरपासून विजयश्री पुन्हा खेचून आणाल. आणखी नाव होईल. ■


(मागील पानावरून)

तहाची भाषा करतील. राजकारणातील आगेकूच वाढत जाईल. समाजात प्रतिष्ठा वाढेल. डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी नव्या विचारांच्या व्यक्ती भेटतील. नव्या कार्यास सुरुवात होईल. जूनमध्ये मान-सन्मान होईल. मे, जुलै वाहनांपासून धोका संभवतो. तणाव, संघर्ष वाढेल. सर्वातून सहिसलामत बाहेर पडून तुमचे वर्चस्व वाढेल.

**विद्यार्थी :-** मागील वर्षाच्या यशापेक्षा २००८ मध्ये तुम्ही फारच चांगले यश मिळवू शकाल. परदेशी शिक्षण व नोकरी घेता येईल. गुणवत्तायादीत अतिहुशार मुले चमकतील. मनाप्रमाणे आवडत्या क्षेत्रात शिक्षणासाठी प्रवेश मिळेल. मे, जुलैमध्ये त्रास संभवतो.

**साहित्य-कला- क्रीडा :-** तुमच्या कार्याचा गौरव होईल. नव्या लेखनाची संधी मिळेल. कलावंतांना प्रसिद्धीला नेणारी भूमिका मिळेल. चांगली मित्रमंडळी मिळतील. एकोप्याने नव्या कार्याची सुरुवात करता येईल. आर्थिक आलेख उंचावेल. प्रशस्तिपत्र, पदक व मान मिळेल.

## धनु



**चिंता मधमाशीसारखी असते. तिला जितकी दूर करण्याचा प्रयत्न कराल तितकी ती अधिक चिकटून बसते.**

गेली दोन वर्षे आपण भरपूर चिंता केली. त्रास सहन केलात. मधमाशीसारखी आपणास चिकटलेली चिंता आता २१ नोव्हेंबरच्या गुरु राश्यांतरापासून दूर होणार आहे व सर्वच क्षेत्रांत आपल्या प्रगतीचा आलेख उंचावत जाणार आहे. आता चिंता दूर होतील. राजकीय क्षेत्रात, धंद्यात, नोकरीत आपण एकमत साधू शकाल व विजयश्री खेचून आणाल. २९ एप्रिलचे राहू राश्यांतर नोकरीत बदली, पगारवाढ, उच्चपद देऊन जाणारे आहे.

शेअर्स उलाढालीत फायदा होईल. धंद्यात आर्थिक आवक वाढेल. नोकरीत वरिष्ठ खुश राहतील. नवीन गुंतवणूक फायदेशीर ठरेल. नवे प्रकल्प उभारू शकाल. आता चिंता करू नका. 'चिता' मरण पावलेल्याला जाळते तर 'चिंता' जिवंत माणसाला जाळते.

**राजकीय व सामाजिक क्षेत्र :-** राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करताना स्वभावातील भिडस्तपणा तुम्हाला मागे टाकतो. मागील वर्षात तुमची झालेली पीछेहाट संपली आहे. हातात मिळालेले व घेतलेले काम तुम्ही पूर्ण करू शकाल, आत्मविश्वास वाढेल. श्रेष्ठ व ज्येष्ठ नेत्यांचे सहकार्य लाभेल. त्यामुळे चोहोबाजूंनी कामाचा वेग वाढवता येईल. तुमच्या शब्दाला व मताला किंमत येईल. डिसेंबर महिन्यात संधी हुकण्याची शक्यता. फेब्रुवारीपासून तुमच्या प्रगतीला वेगाने सुरुवात होईल. नवा उपक्रम राबवता येईल. एप्रिल, जून, ऑगस्ट महिने कसोटीचे आहेत.

**विद्यार्थी :-** विद्यार्थिवर्गाला मनापासून अभ्यास करता येईल. नापास होण्यासाठी कोणतेही कारण नसेल. उत्साह वाढेल. नव्या विषयासाठी प्रवेश घेता येईल. जीवनाला चांगली कलाटणी देणारी संधी उपलब्ध होईल. सहकार्य मिळेल.

**साहित्य-कला-क्रीडा क्षेत्र :-** खेळाडूंना मागील वर्षात प्रकृतीचा त्रास सहन करावा लागला तो कमी होऊन पुन्हा नव्या उमेदीने पुढे जाता येईल. कलावंत व लेखक उज्ज्वल भवितव्यासाठी परदेशाची वारी करतील. चांगल्या भूमिका मिळाल्याचा आनंद मिळेल. आर्थिक आवक वाढेल. सुखी स्वप्न पाहाल. मे, जून दुखापत संभवते. मार्च, मे, सप्टेंबर सत्कार समारंभ होतील.



## मकर

**दु:खद घटना एकामागून एक गरुडभरारीने येतात. पण जातात मात्र मुंगीच्या पावलांनी.**

चांगला काळ नेहमी भुर्रकन उडून जातो. मात्र आता शनि महाराज आपल्या मृत्यु स्थानातून भ्रमण करीत आहे. २१ नोव्हेंबरला गुरु व्ययस्थानात प्रवेश करेल व एकामागून एक अशी संकटांची, दु:खाची मालिकाच सुरू होणार आहे. डिसेंबर, जानेवारी महिने धक्कादायक घटनांचे जातील. कोणतेही संकट अचानक उद्‌भवेल. घरातील वृद्ध व्यक्तीचे निधन. न भरून येणारे नुकसान यंदाच्या

(पुढील पानावर)

(मागील पानावरून)
वर्षात संभवते. मात्र २९ एप्रिल राहू आपल्याच राशीत आल्यावर मुंगीच्या पावलांनी एक एक संकटे दूर होतील. सप्टेंबरनंतर जोरदार प्रगती सुरू होईल.

आर्थिक बाबतीत यंदा ज्यांची जन्मकुंडली बलवान असेल त्यांना फार मोठा आर्थिक लाभ होऊ शकतो. मे नंतर धंद्याला गती प्राप्त होईल. नोकरीत कामाचा व्याप वाढणार आहे. नवीन नोकरी शोधणाऱ्यांनी मेनंतरच प्रयत्न करावेत.

**राजकीय व सामाजिक क्षेत्र :-** जानेवारी महिन्यात एकटेपणाची भावना मनाला त्रासदायक होईल. आपण एका बाजूला फेकले गेलो आहोत असे वाटेल. मे, जुलै महिन्यांत गुप्त कारवायांचा त्रास जाणवेल. मकर राशीच्या व्यक्ती धीरगंभीर असतात. त्यामुळेच कठीण काळातही त्यांचे मनोबल टिकून राहते. श्रेष्ठ व्यक्तींचा पाठिंबा कमी झाल्याची खंत मनाला त्रस्त करणार आहे; परंतु ईश्वरी शक्ती मात्र तुमच्या पाठीशी राहील. कुसंगत नको. व्यसन व विलासीवृत्तीच्या आहारी जाणे महागात पडेल.

**विद्यार्थी :-** विद्यार्थिवर्गाला परिश्रमाची जास्त गरज आहे. खेळात व मित्रांच्या संगतीत वेळ वाया घालवून नुकसान होईल. नकळत झालेली चूक अंगाशी येईल. पास होण्यासाठी वाकड्या वाटा शोधू नका. चांगल्या सल्ल्याची तुम्हाला गरज आहे.

**साहित्य-कला-क्रीडा :-** तुमच्या वाट्याला अनेक कामे येतील. त्यामुळे नेमके कोणते स्वीकारावे याचा गोंधळ कलावंतांना होईल. पैसा वेळेवर मिळणे कठीण होईल. खेळाडूंना फारच कठोर स्पर्धेचा डाव खेळावा लागेल. अपयशाने खचून न जाता पुढे जावे लागेल. आपण लिहिलेले लिखाण आवडले तरी त्याला योग्य प्रतिसाद मिळणे कठीण होईल. मार्च, एप्रिल, ऑगस्ट शुभवार्ता समजेल. परदेशात जावे लागेल.

## कुंभ



**जखम करणारा ती विसरतो ,पण ज्याला जखम होते तो ती कसा विसरेल?**

**का**ही जणांना सतत टोचून बोलण्याची सवय असते. दुसऱ्याला बोलून गप्प करावयाचे व आपली शेखी मिरवायची ही सवय जगात अनेकांना असते. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांशी कसे बोलावे, कसे वागावे हे शिकविणारे क्लासेस काढावयास हवेत असे आमचे एक स्नेही ज्यांची वर्षाला ८०० कोटी उलाढाल आहे ते एकदा म्हणाले होते. गेली दोन वर्षे अशी अनेक माणसे आपणास भेटली असतील. एप्रिल २००५ नंतर झालेल्या अनेक मानसिक जखमा आपल्या हृदयावर कोरल्या गेल्या असतील. त्या आपण विसरू शकत नाही. मात्र आता २१ नोव्हेंबरचे गुरु राश्यांतर अशा लोकांना परस्पर धडा देणार आहे. आपण सर्वच क्षेत्रांत बाजी मारून जाल.


शेअर्स उलाढालीत फायदा. नवीन प्रकल्प पुढे येतील. परदेशी गुंतवणूकदार मिळतील. धंद्यात मोठी झेप घेऊ शकाल. नोकरीस मे, जूनमध्ये त्रास. मनाप्रमाणे पगारवाढ मिळणे कठीण आहे. आयात-निर्यातीत फायदा.

**राजकीय व सामाजिक क्षेत्र :-** राजकीय क्षेत्रात मगील वर्षापेक्षा २००८ मध्ये जास्त वरची पायरी गाठू शकाल. विचारांना व कार्याला योग्य दिशेने वळवता येईल. लोकप्रियता वाढेल. नवीन उपक्रम राबविल्यामुळे मार्चमध्ये प्रसिद्धी मिळेल. ऑगस्टमध्ये विरोधकांचा त्रास सहन करावा लागेल, नुकसान संभवते. दुखापत संभवते. मे महिन्यात जवळच्याच व्यक्ती तुम्हाला पेचात टाकतील. अवघड निर्णय घ्यावा लागेल. तडजोड करावी लागेल.

**विद्यार्थी :-** ग्रहांची साथ आहे. त्यामुळे पास होणार; परंतु जास्त परिश्रम घेतल्यास गुणवत्तायादीत येता येईल. परदेशी शिक्षणासाठी जाता येईल. नवीन क्षेत्रात प्रवेश मिळेल.

**साहित्य-कला-क्रीडा क्षेत्र :-** फार मोठ्या स्वरूपातील प्रतिष्ठा आपणास मिळेल. सुवर्णपदक, नवलौकिकात वाढ होईल. लोकसंग्रह वाढेल. स्तुतिसुमने उधळली जातील. मे महिन्यात जिवावरचे दुखणे अथवा एखादा प्रसंग उद्‌भवण्याची शक्यता आहे. आर्थिक प्राप्ती सुखकारक असेल.

## मीन



**ज्याप्रमाणे लहानशा दिव्याचा प्रकाश अंधारात दूरपर्यंत पसरतो, त्याप्रमाणे या वाईटाने भरलेल्या दुनियेत परोपकाराचा प्रकाश दूरपर्यंत चमकत असतो.**

**मी**न राशीच्या व्यक्तींकडे परोपकारी वृत्ती असते. त्यामुळे त्यांचे मित्रमंडळ मोठे असते. त्यांचा स्पष्टवक्तेपणा मात्र कधी-कधी दुर्गुण ठरतो. यंदाच्या वर्षात शनि महाराज शत्रुस्थानातून भ्रमण करीत आहेत. गुरु २७ नोव्हेंबरला व्यवसाय-धंद्याच्या स्थानात प्रवेश करेल. यंदाच्या वर्षात आपण सर्वच क्षेत्रांत बाजी मारून जाल. २९ एप्रिलच्या राहू राश्यांतरानंतर तर आपला प्रगतिरथ वेगाने धावू लागेल.

या वर्षात आर्थिक आवक बऱ्यापैकी राहणार असली तरी शेअर मार्केट व स्थावर मालमत्ता व्यवहारात जपून राहा. धंद्यातील समस्या संपुष्टात येऊन चांगली बाजारपेठ मिळेल. नोकरी करणाऱ्यांना एप्रिलनंतर बदली, पगारवाढ मिळेल. परदेश प्रवास होईल. बेकारांना नोकरी लागेल.

**राजकीय व सामाजिक क्षेत्र :-** राजकीय क्षेत्रात नवे मार्ग दिसले तरी त्यासाठी तडजोड करावी लागेल. २००८ चा मार्च विश्वास-घात संभवतो. आर्थिक देवघेव सावधपणे. कोर्ट खटल्याच्या वादात जून ०८ मध्ये अडकू नका. सामाजिक क्षेत्रात उगाच दडपण वाटेल. 'आपण भले की आपले काम भले' या तत्त्वाचाही त्रास जाणवेल. राजकारणात तुमच्या नावाची बदनामी करण्याचा प्रयत्न २००८ च्या जून, ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये होईल. विचारपूर्वक निर्णय घ्यावा लागेल. गोड बोलणाऱ्या व्यक्तींच्या सहवासात रमाल व फसाल.

**विद्यार्थी :-** तुम्हाला खाण्याची आवड आहे; परंतु प्रमाणाबाहेरची तुमची आवड तुमच्या परीक्षेत अडसर निर्माण करू शकते. रुचेल, पचेल असे योग्य अन्न घ्या. अभ्यासाला वेळीच सुरुवात करा. कुसंगतीचा दोष पटकन लागतो. शॉर्टकटने यश मिळवता येणार नाही.

**साहित्य-कला-क्रीडा :-** नवे परिचय होतील. थोरा-मोठ्यांचे सहकार्य लाभेल. नवीन कामे मिळतील. मार्चमध्ये तुमच्या कामात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न होईल. एप्रिलमध्ये विशेष खुशी होईल, गौरवाचे उद्‌गार निघतील, कामाचे चीज झाल्याचे समाधान मिळेल. जून-जुलैमध्ये जवळच्या व्यक्तीच्या विरहाने निराश व्हाल. प्रगतीच्या नवीन दिशा एप्रिल, मे, जून व ऑगस्टमध्ये मिळतील.